विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी (न्यायालय क्र.२), वर्धा, जि.वर्धा यांचे न्यायालय

## गुन्ह्याचा तपशील

सं.फौ.खटला क्र. 1172 /२०26 निशाणी क्रमांक : 04

CNR : MHWR0300 2080-2026

१) गुन्हा घडल्याची तारीख : 05/03/2026

२) गुन्हा नोंद झाल्याची तारीख : 05/03/2026

३) तक्रारकर्ता, नाव व पत्त्यासह : महाराष्ट्र शासनातर्फे पोलीस ठाणे अधिकारी, सावंगी मेघे ता. जि.वर्धा.

४) आरोपीचे नाव : इस्राईल अहमद शेख
वय-3_ वर्षे, व्यवसाय—चालक
रा. तारफैल वर्धा

५) गुन्ह्याचा तपशील :

दिनांक 05/03/2026 रोजी 19:55 वाजताच्या दरम्यान मौजा सावंगी मेघे टि पॉईन्ट येथे सार्वजनिक ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन क्र. MH32-AK-1062 रस्त्याच्या मधोमध लोकांना त्रास होईल अशा धोकादायक स्थितीत वाहन उभे केले व त्याप्रमाणे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ चा अपराध केला असून तो त्याच कलमान्वये दंडनीय आहे व तो माझे कार्यक्षेत्रात येत आहे.

समक्ष
MRChavan
14/03/26

(श्रीमती एम. आर. चव्हाण (हिवराळे))
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
[न्याया. क्र.२], वर्धा.

दिनांक : १४/०३/२०२६

विशेष समन्स नि.क्र. 02 सोबत आरोपीने दाखल केलेली पुर्सिस नि.क्र. 03 आणि आधार कार्डची छायांकित प्रतीचे अवलोकन केले. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २२९ प्रमाणे आरोपीला विशेष समन्स फॉर्म ३१ शेडयुल–२ प्रमाणे पाठविले असता त्याने न्यायालयात हजर न राहता गुन्हा कबुल असल्याबाबतचा पर्याय निवडला. त्या अनुषंगाने त्याने विशेष समन्समध्ये नमुद असलेली दंडाची रक्कम समन्ससोबत पाठवली आहे. त्यामुळे वर नमुद परिस्थिती व कारण विचारात घेता, हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम २७५ प्रमाणे भारतीय न्याय संहिता, कलम २८५ प्रमाणे शिक्षापात्र गुन्ह्याकरीता रक्कम **रु. ५००/–** दंड ठोठावण्यात येत आहे, परंतू आरोपीने विशेष समन्ससोबत दंडाची रक्कम भरली आहे. सबब, प्रकरण निकाली काढण्यात आले. आरोपीचे विरूध्द जामीनपात्र अथवा अजामीनपात्रबाबत आदेश पारित झाले असल्यास तो रद्द करण्यात येतो.

२. संबंधीत सहाय्यक अधिक्षक यांनी दंडाची रक्कम स्विकारावी.

16/03/26

(श्रीमती एम. आर. चव्हाण (हिवराळे))
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
[न्याया. क्र.२], वर्धा.

दिनांक : १४/०३/२०२६

Received Amt of Rs. 500/-
(Five Hundred Rs. only)
Vide F.R. No 239.
SS clerk.
14/3/26